# ऋणनिर्देश

इ.स. २००० ते २००६ या कालावधीत विधानपरिषद सदस्य या नात्याने आलेला अनुभव, महिला आमदारांची भाषणे व त्यांच्याशी संबंधित काही संलग्न गोष्टींवर प्रबंध लिहिण्याची कल्पना मला सुचली व ती प्रत्यक्षात आता येत आहे. यासाठी ज्यांनी मला बहुमुल्य असे मार्गदर्शन केले, ते माझे मार्गदर्शक डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे यांची मी सदैव ऋणी राहीन. वेळोवेळी प्रत्येक बाबतीत दृष्टिकोण, मराठी भाषेतील बारकावे या सर्व बाबी चिकित्सक पद्धतीने माझ्या लिखाणात आणल्या. माझ्या राजकीय प्रवासात हा प्रबंध लिहितांना अनेक अडथळे आले, परंतु ते समजुन घेऊन श्री. देशपांडे सरांनी व आत्ताच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. अरूणा दुभाषी मॅडम यांनी मोलाचे सहकार्य मला केले. डॉ. अरूणा दुभाषी मॅडम यांची देखील मी सदैव ऋणी राहीन.

सौ. साहित्यलक्ष्मी देशपांडे यांना विसरून चालणार नाही. वेळोवेळी घरी गेल्यावर हसतमुखाने स्वागत करून माझ्या कार्याला प्रेरणा देण्याचे काम त्यांनी केले. त्यांचीही मी ऋणी आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या ग्रंथालयाचेग्रंथपाल श्री. बा.बा.वाघमारे यांनी मला सर्व आमदारांची भाषणे, आमदारांचे अहवाल देण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले. सदैव मदतीसाठी तत्पर असणाऱ्या श्री. वाघमारे यांची ही मी सदैव ऋणी राहीन.

डॉ. अनिता पाटील यांनी तर माझ्या या प्रवासात अत्यंत मोलाचे मार्गदर्शन व साथ दिली, सदैव दिली, वेळ काळ न पहाता मी त्यांना अनेक वेळा त्रास दिला. परंतु त्या माझ्या मदतीसाठी अत्यंतिक स्नेहाने पुढे येतच राहिल्या. त्यांचीही मी सदैव ऋणी असेन.

सौ.मयुरी चव्हाण यांनी माझ्या प्रबंधाला आकार दिला. अनेक अडचणी त्यांना असूनही त्याही सदैव माझ्या साथीला राहिल्या, त्यामुळेच हा प्रबंध पूर्ण होऊ शकला. त्यांचीही मी सदैव ऋणी राहीन.

माझे पती जयसिंगराव नलावडे, माझा पुत्र अमोल नलावडे, माझी स्नुषा सौ. नयना नलावडे, माझी कन्या शिल्पा कुलकर्णी, जावई अमित कुलकर्णी व नाती प्रिषा, ईरा, इति यांच्या स्नेहाच्या आपुलकीच्या सहवासात माझे लिखाण सहजपणे प्रत्यक्षात कागदावर उतरले. माझे प्रेमळ कुटुंब ही माझी प्रेरणा आहे. त्यांचीही मी सदैव ऋणी असेन.

मराठी विभागाचे डॉ. श्री. सुनिल रामटेके सर, सौ. राजश्री कुलकर्णी यांनी ही सातत्याने प्रेरणा देण्याचे काम केले. यांचीही मी सदैव ऋणी राहीन.

राजकीय क्षेत्रातील अनेक मित्र, मैत्रिणी, ज्ञात, अज्ञात व्यक्ती यांचाही सहवास, साथ, आशीर्वाद प्रबंध निर्मितीच्या या कामात मोलाचा ठरला त्या सर्वांची मी आजन्म ऋणी राहीन

~*~*~*~